साप्ताहिक

# परळी परिसर

Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028

❋ परळी वैजनाथ ❋ सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६ ❋ पाने-४ ❋ २/- ₹ www.parliparisar.com

शालेय स्टेशनरी व विविध प्रकारच्या आकर्षक छपाईसाठी...
न्यू सुधांशू प्रिंटर्स
श्रीनाथ चित्रमंदिरच्या मागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, Mob.9881244075
कापडी पिशव्या छापून मिळतील.

# ऊस वाहतुकीच्या डबल ट्रॉल्या व जड वाहतुकीमुळे परळीत वाहतुकीची कोंडी

परळी वैजनाथ (लक्ष्मण वाकडे):- परळी शहरातून जाणाऱ्या छत्रपती संभाजी चौक ते रेल्वे उड्डाणपूल, एकमिनार चौक, बस स्थानक, शिवाजी महाराज चौक, मौलाना आझाद चौक या मार्गावरून होणाऱ्या ऊस वाहतुकीच्या डबल ट्रॉल्या इतर जड वाहनांची वाहतूक यामुळे या मार्गावर सतत होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे सर्वसामान्यांसह इतर वाहनचालकांची मोठी गैरसोय होत असून या ट्रॉल्यांसह इतर जड वाहनांची वाहतूक बायपास रस्त्यावरून वळवण्याची मागणी येथे नागरिकांकडून होत आहे.



वाहतुकीच्या या गंभीर समस्येकडे येथील पोलीस प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिक तीव्र संताप व्यक्त करत आहेत. सध्या साखर कारखान्याचा गळीत हंगाम सुरू आहे. या कारखान्यांसाठी लागणाऱ्या उसाची वाहतूक परळी शहरातील छत्रपती संभाजी चौक ते रेल्वे उड्डाणपूल, छत्रपती शिवाजी महाराज चौक, आझाद चौक या मुख्य मार्गावरून होत आहे. गंगाखेड, सोनपेठ, सिरसाळा या भागातून अंबाजोगाईकडे तसेच परळीतून पांगरी, सोनपेठ, गंगाखेडकडे मोठ्या प्रमाणात उसाची वाहतूक सुरू आहे. ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर चालक ट्रॅक्टरला उसाच्या डबल ट्रॉल्या लावत आहेत यामुळे वाहतूक जड होऊन ट्रॅक्टरचा वेग रस्त्यावरून मंदावत आहे. यामुळे या ट्रॅक्टरच्या मागून येणाऱ्या इतर वाहनाची गती कमी होऊन रस्त्यावर वाहतुकीची कोंडी होत आहे. त्यातच ट्रॉल्यात तसेच इतर ट्रक मधून उसाचे तुकडे भरले जात आहेत. त्यामुळे रस्त्यावरून ये-जा करणाऱ्या वाहनांवर, दुचाकी चालकांच्या अंगावर उसाचे तुकडे पडत आहेत. यामुळे नागरिकांची व वाहनचालकांची गैरसोय होत आहे. ट्रॉल्यात, ट्रक, ट्रॅक्टरमध्ये क्षमतेपेक्षा अधिक ऊसाची वाहतूक होत असल्याने चालकाचे वाहनांवरील नियंत्रण सुटल्याने ऊस वाहतूक करणाऱ्या कांही ट्रॉल्या या मार्गावर पलटी झाल्याच्या घटना घडल्या आहेत. या ट्रॉल्यामुळे तसेच उसाच्या व इतर जड वाहतुकीमुळे या शिवाय राख, सिमेंट व इतर जड वाहनांच्या वाहतुकीमुळे परळी शहराच्या मुख्य रस्त्यावर वाहतुकीची सातत्याने कोंडी होऊन नागरिकांची, वाहनचाकांची मोठी गैरसोय होत आहे. या गंभीर समस्याकडे परळी पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. त्यामुळे सर्वसामान्य नागरिक, परळी पोलिसांच्या कारभाराबाबत तीव्र संताप व्यक्त करत आहेत. दरम्यान परळी शहराच्या मुख्यमार्गावरून जाणाऱ्या ऊस वाहतुकीच्या ट्रॉलींसह इतर जड वाहनांची वाहतूक बायपास रस्त्याने वळवावी, अशी नागरिकांची मागणी आहे. या गंभीर समस्येकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष घालावे; ही मागणी नागरिकांकडून होत आहे. ❋❋❋❋

# परळीत १३ फेब्रुवारीपासून पशु-पक्षी प्रदर्शन

## राज्यातील पशुपक्षी मालकांना सहभागी होण्याचे आवाहन

मुंबई, (जि.मा.का.):- बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत 'अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे' आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू आहे. या पशुपक्षी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.

या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळतील. केवळ महाराष्ट्र नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम वेगाने सुरू आहे. ''या प्रदर्शनाच्या माध्यमातून पशुपालकांना पशुसंवर्धनाविषयीची संकीर्ण व अद्ययावत माहिती एकाच छताखाली उपलब्ध होईल. याचा मोठा फायदा पशुपालन व्यवसायाला चालना देण्यासाठी होईल,'' असा विश्वास पशुसंवर्धन आयुक्त डॉ. प्रवीणकुमार देवरे यांनी व्यक्त केला आहे. नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे. ❋❋❋

# सीटू कामगार संघटनेचा गुरूवारी तहसील कार्यालयावर मोर्चा-प्रा खाडे

परळी वैजनाथ, (बातमीदार):- कामगारांनी शंभर वर्षाच्या लढ्यातून कामगारांच्या हिताचे निर्माण केलेले कामगार कायदे मोदी सरकारने रद्द केले आहेत. कामगार विरोधी मालकधार्जिन्या चार श्रमसंहिता लागू केल्या आहेत. चार श्रमसंहिता रद्द करा या मागणीसाठी देशातील सर्व कामगार संघटना १२ फेब्रुवारी रोजी संप करत आहेत. बीड जिल्ह्यात सिटू कामगार संघटना ही चार श्रमसंहिता रद्द करा या मागणीसाठी १२ फेब्रुवारी रोजी परळी वैजनाथ तहसीलवर मोर्चा काढून आंदोलन करणार आहे.

या श्रमसंहितांमुळे कामगार अस्थिर होणार व तो कायमचा नोकरीला मुकणार आहे. कारखान्यातील सर्व नोकऱ्या तात्पुरत्या होणार आहेत. सर्व तरुण कामगारांचा विचार करता केंद्र सरकारचे धोरण चुकीचे आहे. त्यामुळे सिटूचा श्रमसंहितेस विरोध आहे. सिटू अंतर्गत परळी तालुक्यातील बांधकाम कामगार संघटना, लालबावटा कामगार युनियन, आशा वर्कर्स युनियन, शालेय पोषण आहार संघटना, असंघटित कामगार संघटना या मोर्चात सहभागी होणार आहेत. हा मोर्चा रोडे चौकातील सिटू कार्यालयापासून दुपारी बारा वाजता निघून तहसीलवर पोहोचणार आहे. कामगार विरोधी श्रमसंहिता रद्द करा, खाजगीकरण थांबवा, नगरपालिकेतील रोजंदारी कामगारांना कायम करा, कामगारांना आठ तासाच्या कामास मासिक वेतन तीस हजार रुपये द्या, सर्व ज्येष्ठांना दहा हजार रुपये मासिक पेन्शन द्या, अशा अंगणवाडी कर्मचारी शालेय पोषण आहार कर्मचारी यांना कायम करा व किमान वेतन द्या, बांधकाम कामगारांना दहा हजार रुपये मासिक पेन्शन द्या, बांधकाम कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी आर्थिक मदत चालू ठेवा, घरेलू कामगारांच्या मुलांना शिष्यवृत्ती द्या, घरेलू कामगारांना तात्काळ आश्वासनाप्रमाणे भांडे व सन्मान धन द्या घरेलू कामगारांना दहा हजार रुपये पेन्शन द्या आदी मागण्यांसाठी तहसील कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चात सिटू कार्यालयापासून सर्व कामगारांनी सहभागी व्हावे असे आवाहन सिटूचे अध्यक्ष प्रा. खाडे बी.जी., किरण सावजी, जालिंदर गिरी, सुवर्णा रेवले, हेमा काळे, आशा लांडगे, प्रकाश वाघमारे, शेख जावेद, कुशावर्ता गांगर्डे, रेखा जाधव, यमुना पाथरकर, रमेश पांचाळ, हनुमंत रुपनर आदींनी केले आहे. ❋❋❋

# बीड जिल्हयामध्ये १० वी व इ.१२ वी परीक्षेसाठी कॉपीमुक्त अभियान राबवावे - जिल्हाधिकारी

बीड, (जिमाका):- दक्षता समितीची बैठक जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, यांच्या अध्यक्षतेखाली दि.०३ फेब्रुवारी २०२६ रोजी घेण्यात आली. या बैठकीसाठी सर्व समिती सदस्य उपस्थित होते. तसेच दूरदृश्य प्रणालीव्दारे तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. सदर बैठकीत जिल्हाधिकारी यांनी प्रत्येक परीक्षा केंद्रावरील प्रत्येक वर्गखोलीत उाढत कैमेरे बसवून ते कार्यान्वयीत करावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावर आवाजाचे रेकॉर्डींग होणारे CCTV कैमेरे बसवावेत, त्याची तपासणी तहसिलदार, गटविकास अधिकारी व गटशिक्षणाधिकारी यांनी पुढील दोन दिवसात करावी व त्याचा अहवाल सादर करावा, तसेच CCTV कैमे-यांचे ॲक्सेस जिल्हास्तरावर कंट्रोल रुम स्थापन करून तेथे घेण्यात यावेत, संवेदनशील परीक्षा केंद्रावरील आणि ज्या परीक्षा केंद्रातील वर्ग खोलीमध्ये CCTV कॅमेरे नसतील, तेथील केंद्रसंचालक, पर्यवेक्षक व परीक्षेशी संबंधित इतर कर्मचारी यांची अदलाबदल करावी, परीक्षा केंद्रावर नियुक्त कर्मचाऱ्या व्यतीरिक्त इतर कर्मचारी तसेच व्यक्तीना प्रवेश देऊ नये, इतर कर्मचारी परीक्षा केंद्रावर आढळल्यास त्यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, परीक्षा केंद्रावर अनुदानित, अंशतः अनुदानित व जिल्हा परिषदेचे शिक्षक व इतर कर्मचारी नेमावेत, परीक्षा केंद्रावरील सर्व कर्मचाऱ्यांसाठी ओळखपत्र अनिवार्य करण्यात यावे, तालुकास्तरावरुन महत्वाच्या पेपरला वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी परीक्षा केंद्रांना भेटी द्याव्यात. बीड जिल्हयामध्ये कॉपीमुक्त अभियान राबवून जिल्हा कॉपीमुक्त होण्याच्या दृष्टीने संबंधित यंत्रणेने प्रयत्न करावेत, तसेच संवेदनशील परीक्षा केंद्रावर जास्तीत जास्त लक्ष ठेवून परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्यासाठी संबंधित अधिकारी. कर्मचा-यानी लक्ष द्यावे असेही श्री. जॉन्सन या प्रसंगी म्हणाले. या बैठकीस संबधित अधिकारी उपस्थित होते. बीड जिल्हयामध्ये मंडळातर्फे उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इयत्ता १२ वी) व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी) फेब्रुवारी मार्च-२०२६ आयोजित केल्या आहेत. उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा दि.१०फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ आणि माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा दि.२० फेब्रुवारी ते दि.१८ मार्च २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आल्या आहेत. ❋❋❋

# ग्लोबल विकास ट्रस्टकडून ११ जोडप्यांचा भव्य सामुदायिक विवाह सोहळा संपन्न



परळी वैजनाथ (बातमीदार)ः- ग्लोबल विकास ट्रस्टच्या पुढाकारातून आणि उद्योजक राजेश मेहता यांच्या सहकार्यातून यावर्षीचा भव्य असा सामुदायिक विवाह सोहळा संपन्न झाला. आत्महत्याग्रस्त कुटुंब, अंध आणि अपंग असलेले पालक किंवा अतिशय दुर्बल आर्थिक स्थिती असलेल्या कुटुंबातील जोडप्यांची या सामुदायिक विवाह सोहळ्यात निवड करण्यात आली होती. कृषीकुल शेतकरी प्रशिक्षण केंद्राच्या जवळ भव्य मंडप उभारण्यात आला होता. सिरसाळा - पोहनेर रोड लागत संपन्न झालेल्या भव्य विवाह सोहळ्यास ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी, नीती आयोगाचे सदस्य रमेश चंद, डॉ.हरिश्चंद्र वंगे, संजय परमार आदींसह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून नव वधू आणि वरांना शुभाशीर्वाद दिले.

ग्लोबल विकास ट्रस्ट आणि राजेश मेहता यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा सामूहिक विवाह सोहळा अतिशय उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास हजारो पाहुण्यांची उपस्थिती होती. उपस्थितांच्या साक्षीने सर्वांना हुंडा न देण्याची आणि घेण्याची शपथ देण्यात आली, त्याबरोबरच कोणीही कुठल्याही कारणाने आत्महत्या करणार नाही आणि आजुबाजूला कोणाला करू देणार नाही. नैराश्याच्या गर्तेत जर कोणी निदर्शनास आले तर त्याच्या अडचणी सोडवण्यासाठी ग्लोबल विकास ट्रस्ट नक्कीच प्रयत्नशील राहील. गोरगरिबांचे आशिर्वाद आणि त्यांच्या शुभेच्छा याच माझ्यासाठी मोठी संपत्ती असून यामुळेच भविष्यात अधिकाधिक काम करण्याची ऊर्जा मला मिळते. दरवर्षी असा अतिभव्य विवाह सोहळा आयोजित करून गोरगरीब कुटुंबांना मदतीचा हात देण्याचीही घोषणा आजच्या विवाह सोहळा प्रसंगी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना जलनायक मयंक गांधी यांनी बोलून दाखवली. यंदाच्या विवाह सोहळ्यात सहभागी ११ जोडप्यांच्या नावे रुपये २५ हजारांची बचत ठेव ठेवण्यात येणार असल्याचेही संयोजकांनी घोषित केले. विवाह सोहळ्यात सहभागी वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र तसेच पैंजणही भेट देण्यात आले. आलेल्या सर्व वऱ्हाडी मंडळीची भोजन आणि बसण्याची व्यवस्था करण्यात आली होती. ऋतढ च्या सर्व स्वयंसेवकांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**८११ जोडप्यांच्या नावे प्रत्येकी २५ हजारांची बचत ठेव-**

ग्लोबल विकास ट्रस्टच्या वतीने दरवर्षी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात येते. यंदाही सलग दुसऱ्या वर्षीचा विवाह सोहळा संपन्न झाला. या विवाह सोहळ्यात सहभागी जोडप्यांना संसारोपयोगी साहित्य, वधूला सोन्याचे मणी मंगळसूत्र व पायातील पैंजण आणि त्याचबरोबर प्रत्येक जोडप्याच्या नावे २५ हजारांची बचत ठेव बँकेत करण्यात येत आहे. कॉट, गादी, संसारोपयोगी भांडे तसेच अन्य वस्तूंची भेटही या विवाह सोहळ्यात देण्यात आली असून, दरवर्षी हा सोहळा आयोजित केला जाईल असेही घोषित करण्यात आले. **



परळी वैजनाथ:- येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या यात्रा महोत्सवाची सध्या जोरदार तयारी मंदिर व परिसरात सुरू आहे. भाविकांच्या सोयीसाठी उत्तरघाटावरील पायऱ्यावर दर्शन मंडप टाकण्याचे काम सध्या युद्धपातळीवर सुरू आहे. येत्या रविवारपासून महाशिवरात्री यात्रा महोत्सवाला सुरूवात होणार आहे.

# बांधकाम सभापती प्रा.पवन मुंडे यांनी केली सार्वजनिक स्मशानभूमीची पाहणी



परळी वैजनाथ (बातमीदार):- नगर परिषदेतील बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे पदभार घेताच ''ॲक्शन मोडवर'' आले आहेत. पदभार घेताच त्यांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. सर्वात प्रथम त्यांनी शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीला भेट देऊन पाहणी केली. तेथे विविध कामे करणे गरजेचे असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. अवश्यक ती कामे करण्यासाठी तातडीने पूर्ण करण्याबाबत संबंधितांना त्याबाबत सूचना केल्या. परळी नगरपालिकेतील नवनिर्वाचित बांधकाम सभापती प्रा. पवन मुंडे यांनी पदाचा पदभार घेताच विभागाच्या सर्व अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेऊन विविध विकास कामांची माहिती घेतली. पहिल्याच दिवशी त्यांनी शहरातील सार्वजनिक स्मशानभूमीची पाहणी केली. नदीच्या बाजूने संरक्षक भिंत असणे गरजेचे असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. मृतदेह जाळण्यासाठी करण्यात आलेल्या लोखंडे कठड्याची जाळी पुर्णपणे जळून गेल्याने अंत्यसंस्कार करण्यास अडचणी येत आहेत. अंत्यसंस्काराचे कठडे पुर्णपणे उखडले आहेत. त्याचप्रमाणे नागरीकांना बसण्यासाठी केलेल्या सोयीचीही बरीच पडझड झाली आहे. अशा अनेक समस्या असल्याचे त्यांच्या निर्दशनास आले. अंत्यविधीला आलेल्या नागरिकांना बसण्यासाठी व्यवस्थित जागा नाही.

स्मशानभूमीतील सर्व गैरसोयी दूर करण्यासाठी तातडीने आवश्यक ती उपाययोजना करण्याबाबत त्यांनी सूचना करून संबंधितांना ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याबाबत सूचना केल्या. यावेळी माजी नगराध्यक्ष तथा नगरसेवक बाजीराव धर्माधिकारी, नगरसेवक वैजनाथ सोळंके, नगरसेवक राजा पांडे, नगर अभियंता ज्ञानेश्वर ढवळे आदी उपस्थित होते. ***

# भगवान विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न

## स्नेहसंमेलनाकडे पालकांनी केवळ मनोरंजनांच्या दृष्टिकोनातून पाहू नये-नगराध्यक्षा पद्मश्रीताई धर्माधिकारी

परळी (बातमीदार)ः- शाळांच्या वार्षिक स्नेह संमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळतो म्हणून अशा संमेलनाकडे मनोरंजनाच्या दृष्टिकोनातून पाहू नये तर मुलांचे सुप्त गुण ओळखून त्याचे करिअर घडवावे असे मत परळीच्या नवनिर्वाचित नगराध्यक्षा पद्मशीताई धर्माधिकारी यांनी व्यक्त केले.



येथील भगवान प्राथमिक शाळेच्या वार्षिक स्नेह संमेलनाचे उद्घाटन विद्येची देवता सरस्वती मातेच्या व संस्थेचे दिवंगत संस्थापक सचिव व्यंकटराव कराड यांच्या प्रतिमांचे पुजन व दिप प्रज्वलन,श्रीफळ वाढवून पद्मशीताई यांच्या शुभहस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले यावेळी व्यासपीठावरून उपस्थित पालक व विद्यार्थी यांना संबोधीत करताना पद्मशीताई यांनी वरील मत व्यक्त केले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या की,परळी शहरातील शैक्षणिक व सांस्कृतिक वातावरण वृंद्धिगत करण्यासाठी परळी नगरपालिके तर्फे सर्वोतोपरी प्रयत्न केले जातील असे आश्वासीत केले.

यावेळी व्यासपीठावर संस्थेच्या सचिव व कार्यक्रमाच्या अध्यक्षा प्रियाताई कराड,प्रमुख अतिथी म्हणून परळी नगरपरिषदेच्या नवनिर्वाचित पाणीपुरवठा सभापती श्रीमती जयश्रीताई गीत्ते-मुंडे, बांधकाम सभापती पवनकुमार मुंडे,शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे,नगरसेवकपती तथा सामाजिक कार्यकर्ते प्रितेशजी तोतला,शाळेचे मुख्याध्यापक लिंबाजी दहिफळे, सांस्कृतिक विभाग प्रमुख बंडू अघाव आदिजन उपस्थित होते.

यावेळी सभापती पवनकुमार मुंडे व जयश्रीताई गीत्ते-मुंडे यांनी मनोगत व्यक्त करताना शाळेतील शिक्षक व विद्यार्थी यांचे कौतुक केले व शाळेला वेळोवेळी लागेल ती मदत करण्याचे आश्वासन दिले व संमेलनास शुभेच्छा दिल्या. संस्थेच्या सचिव यांनी अध्यक्षीय समारोप करताना आमच्या शाळेतून विद्यार्थ्यांना अधिकाधिक दर्जेदार शिक्षण व सांस्कृतिक कार्यक्रमातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी प्रयत्नशील राहूत अशी ग्वाही दिली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक दहिफळे यांनी केले तर सुत्रसंचालन शिक्षक गोविंद मुंडे व शिक्षिका श्रीमती संघमित्रा वाघमारे यांनी केले तर आभार सचिन अंबाड यांनी मानले. तसेच संमेलनाच्या सांस्कृतिक कार्यक्रमाचे मंत्रमुग्ध करणारे व प्रेक्षकांना खिळवून ठेवणारे बहारदार सुत्रसंचालन शाळेतील जेष्ठ शिक्षक तथा कवी,शाहीर अनंत मुंडे व शाळेतील कर्तव्यदक्ष व कार्यकुशल शिक्षिका अंजली कुलकर्णी यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेतील शिक्षक दत्तात्रय तिडके,राजेश विभूते, मंहेद्र वाघमारे,सुनील चव्हाण,सचिन गवळी, श्रीमती सिंधु सोनवणे आदिनी अथक प्रयत्न केले. विद्यार्थ्यांचे कला गुण पहाण्यासाठी पालक वर्गासह शालेय परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. तब्बल चार तास कार्यक्रम उत्साहात चालला. ***

# रत्नेश्वर मंदिरात शिवपूजेचे आयोजन

परळी वैजनाथ, (बातमीदार)ः- येथील टोकवाडी परिसरातील रत्नेश्वर मंगल कार्यालयात येत्या १४ व १५ फेब्रुवारीला महाशिवरात्रीनिमित्त शिवपूजेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्ताने भजनसंध्या, महापूजा, महाप्रसाद आदी कार्यक्रम होणार आहे. या शिवपूजेच्या कार्यक्रमात राज्यभरातून तसेच परदेशातूनही साधक येथे उपस्थित राहणार आहेत. सहजयोग ध्यान केंद्र परळी परिवाराच्या वतीने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. **



**परळी वैजनाथ:- येथील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मैदानावर येत्या शुक्रवार (दि.१३) पासून भव्य राज्यस्तरीय पशु प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या प्रदर्शनाची तयारी येथे सुरू आहे.**

संपादकीय...

# मोठी पर्वणी..!

* सुविचार *

**आयुष्यात काही प्रश्नांना वळसा घालून पुढं जाणं म्हणजे समाधानाला जवळ करणं होय..!**

परळीचे आमदार धनंजय मुंडे व विद्यमान पर्यावरण आणि पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे सत्तेच्या माध्यमातून परळीसह या मतदारसंघासाठी व जिल्ह्यासाठी विविध विकास योजना, शासकीय उपक्रम आणत असतात. याचा लाभ येथे जनतेला होतो. मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने व प्रयत्नाने येथील प्रभू वैजनाथ ज्योतिर्लिंगाच्या महाशिवरात्रीनिमित्त भरणाऱ्या यात्रा महोत्सवाच्या पार्श्वभूमीवर येत्या १३ फेब्रुवारीपासून परळीतील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील मोठ्या मैदानावर भव्य राज्यस्तरीय 'महापशुधन एक्सपो' हे पशुप्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन शेतकरी, पशुधनमालक, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

राज्यातील शेतकरी व पशुधनमालक यांना केंद्रबिंदू ठेवून या प्रदर्शनाचे आयोजन पशुसंवर्धन विभागाने केले आहे. १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान हे प्रदर्शन परळीत होत आहे. या प्रदर्शनाची सध्या येथे जोरदार तयारी सुरू आहे. हे प्रदर्शन भव्य दिव्य व्हावे तसेच या भागातील शेतकरी, कष्टकरी शेतमजूर व पशुधनमालकांना त्याचा अधिकाधिक लाभ व्हावा म्हणून खुद्द मंत्री पंकजाताई मुंडे प्रयत्न करत आहेत. इथल्या पशुधन मालकांना नवनवीन पशुधनाची, त्यांच्या निगराणीची तसेच या क्षेत्रातील झालेल्या बदलाची, तंत्रज्ञानाची माहिती व्हावी; हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. जैविकशेती पशुधनापासून पशुधन मालकांना होणारे अधिकाधिक लाभ, पशुधन विषयक विविध माहिती, उत्पादन, बाजारपेठ, खाद्यपदार्थ, विविध शासकीय योजना आदीबाबत शेतकरी, पशुधनमालक यांना या प्रदर्शनातून माहिती मिळणार आहे. या प्रदर्शनात बचतगटांचे स्टॉलही असणार आहेत. या सर्व स्टॉलची संख्या ३०० वर असणार आहे.

या प्रदर्शनात राज्यातील नामवंत विविध जातींच्या पशूंचा समावेश तर असणारच आहे. शिवाय राज्याबाहेरील गुणवंत व दर्जेदार पशुधन किंवा पशुपक्षीही या प्रदर्शनात असणार आहेत. त्यांची खास व्यवस्था येथे केली जाणार आहे. डॉग शोसह विविध प्राण्यासाठी सुमारे ४० प्रकारच्या स्पर्धा प्रदर्शनात आयोजित केल्या जाणार आहेत. यामुळे प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुधनमालकांचा दुहेरी लाभ होणार आहे. या प्रदर्शनाच्या निमित्ताने सामाजिक उपयुक्त उपक्रम म्हणून रक्तदान शिबिर, अवयवदान उपक्रम असे उपक्रमही आयोजित केले जात आहेत. या शिबिरात सहभागी होण्यासाठी राज्यातील पशुवैद्यकीय क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी, शेतमजूर, पशुविषयक विविध साहित्य उत्पादक तसेच या क्षेत्रातील तज्ञ यांच्याबरोबरच मराठवाड्यातील लोकप्रतिनिधी व इतर मान्यवरांना या प्रदर्शनासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. यामुळे परळीसह जिल्हावासियांसाठी हे प्रदर्शन मोठी पर्वणी असणार आहे. या प्रदर्शनाची सध्या जोरदार तयारी येथे चालू आहे. राज्य शासनाच्या पशुसंवर्धन विभागासह जिल्हा प्रशासन हे प्रदर्शन यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेत आहे. दरम्यान या प्रदर्शनात सहभागी होणाऱ्या पशुधन मालक व इतर स्टॉल चालक, उत्पादकांच्या सुरक्षिततेच्या पार्श्वभूमीवर प्रदर्शनस्थळी सीसीटीव्ही कॅमेरे असणार आहेत. शिवाय वैद्यकीय सुविधा कक्ष, रुग्णवाहिका, अग्निशमनदल, पोलीस संरक्षण आदी सुविधा येथे उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. एकूणच हे पशुप्रदर्शन भव्य दिव्य असणार आहे. या प्रदर्शनात सहभागी होऊन त्याचा लाभ बीड जिल्ह्यासह परिसरातील शेतकरी, शेतमजूर, पशुधनमालक व इतर संबंधितांनी घ्यायला हवा...! ***

# त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर



भारतीय समाजक्रांतीच्या इतिहासात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव जसे तेजस्वीपणे झळकते, तसेच त्या क्रांतीच्या मूक शिल्पकार म्हणून त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांचे स्थानही तितकेच महत्त्वाचे आहे.माता रमाई म्हणजे केवळ बाबासाहेबांच्या पत्नी नव्हे, तर त्यांनी उभारलेल्या सामाजिक क्रांतीच्या वाटेवर शांतपणे, निष्ठेने आणि त्यागाने साथ देणारी महान स्त्री होती.

माता रमाईंचा जन्म ७ फेब्रुवारी १८९८ रोजी झाला. अत्यंत साध्या परिस्थितीत त्यांचे बालपण गेले. शिक्षणाच्या फारशा संधी नसतानाही त्यांनी जीवनातून मिळणाऱ्या अनुभवांतून प्रगल्भता, संयम आणि सहनशीलता आत्मसात केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी विवाह झाल्यानंतर त्यांच्या आयुष्याला संघर्षांचे, उपेक्षेचे आणि कठोर वास्तवाचे अनेक पदर लाभले; मात्र माता रमाई यांनी कधीही तक्रार केली नाही, उलट त्या प्रत्येक संकटात बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या.
बाबासाहेबांचे शिक्षण, संशोधन, चळवळी, परदेशातील वास्तव, आर्थिक अडचणी या सर्व काळात रमाई यांनी संसाराची संपूर्ण जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. अनेकदा उपाशीपोटी राहूनही बाबासाहेबांचे शिक्षण थांबू नये, यासाठी त्यांनी स्वतःच्या वेदनांना गप्प ठेवले. त्यांच्या आयुष्यातील सर्वात मोठा त्याग म्हणजे स्वतःच्या इच्छांपेक्षा समाजाच्या उद्धाराला प्राधान्य देणे.

रमाई आंबेडकर यांनी अस्पृश्यतेचा दाह प्रत्यक्ष अनुभवला होता. समाजाकडून होणारा अपमान, अवहेलना आणि दुर्लक्ष त्यांनी शांतपणे सहन केले. बाबासाहेबांवर होणाऱ्या टीका, विरोध आणि कटकारस्थानांचे चटके त्यांनाही बसत होते; मात्र त्यांनी कधीही बाबासाहेबांच्या ध्येयावर शंका घेतली नाही. उलट तुम्ही जे करता आहात ते या देशासाठी आवश्यक आहे असा आत्मविश्वास त्यांनी बाबासाहेबांना दिला. त्यांच्या जीवनात दुःखांचे प्रमाण अधिक होते अपत्यवियोग, आजारपण, दारिद्र्य तरीही रमाई कधीही खचल्या नाहीत. त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजे त्याग, समर्पण, सहनशीलता आणि निस्वार्थ प्रेमाचे जिवंत उदाहरण आहे.
बाबासाहेबांनी अनेकदा आपल्या भाषणांतून आणि लेखनातून रमाईंच्या योगदानाचा ऋणनिर्देश केला आहे, हेच त्यांच्या महानतेचे द्योतक आहे.

आज आपण बाबासाहेबांच्या विचारांवर चालताना, त्यांच्या यशाचा गौरव करताना, त्या यशामागील शांत तपस्विनी रमाई आंबेडकर यांचे स्मरण करणे तितकेच आवश्यक आहे. स्त्री-सक्षमीकरण, आत्मसन्मान आणि सामाजिक न्याय यांचे मूर्त रूप म्हणजे माता रमाई आंबेडकर होत.
१२८ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करताना, त्यांच्या जीवनातून आपण एक महत्त्वाचा धडा घ्यायला हवा क्रांती घडवण्यासाठी केवळ व्यासपीठावर उभे राहणे पुरेसे नसते, तर पडद्यामागे उभे राहून त्याग करणारी माणसेही तितकीच महान असतात.
माता रमाई आंबेडकर यांचे जीवन प्रत्येक स्त्रीसाठी प्रेरणादायी आहे आणि प्रत्येक समाजासाठी दिशादर्शक आहे. त्यांचे स्मरण म्हणजे सामाजिक न्यायाच्या लढ्याला नवी ऊर्जा देणे होय. त्यागमूर्ती माता रमाई आंबेडकर यांना १२८ व्या जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**– प्रा.बालाजी जगतकर,**
पत्रकार, परळी

# अंबाजोगाई ग्रासलॅंड सफारी चा शुभारंभ

बीड, (जिमाका):- बीड वन विभागांतर्गत वनपरिक्षेत्र कार्यालय परळी मध्ये जैवविविधता संवर्धन व रोजगार निर्मिती या उद्देशाच्या अनुषंगाने अंबाजोगाई शहरालगत असलेल्या वन विभागाच्या डोंगराळ, खुरट्या व गवताळ वनक्षेत्रात अंबाजोगाई ग्रॅसलँड सफारी या उपक्रमाची दिनांक २६. १. २०२६ रोजी विधानसभेच्या सदस्या नमिता मुंदडा अंबाजोगाई, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, अंबाजोगाई नगराध्यक्ष नंदकिशोर मुंदडा, विभागीय वनाधिकारी अमोल गरकळ, विभागीय अधिकारी सामाजिक वनीकरण श्रीनिवास लखमावार, अंबाजोगाई उपविभागीय अधिकारी दीपक वांजळे, अंबाजोगाई तहसीलदार विलास तरांगे यांच्या हस्ते शुभारंभ झाला. यावेळी वनक्षेत्रात महात्मा गांधी प्राणी संग्रहालय सोलापूर येथील ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले.

परळी वनपरिक्षेत्रा अंतर्गत अंबाजोगाई शहरालगत वन विभागाचे एकूण १३२८.०६ हे.आर सलग राखीव नक्षत्र आहे. सदरचे क्षेत्र हे डोंगराळ खुरट्या व गवताळ प्रकारचे आहे यामध्ये विविध प्रकारचे वन्यप्राणी जसे की हरिण, लांडगा, कोल्हा, बीबट, तडस इत्यादी प्राण्यांचा तसेच विविध प्रकारच्या पक्षांचा अधिवास मोठ्या प्रमाणावर आहे. तसेच या क्षेत्रामधून वाणा नदीचा प्रवाह वाहत असल्यामुळे वन्य प्राणी व पक्षांना पिण्यासाठी पाण्याची व्यवस्था या ठिकाणी आहे. तसेच अंबाजोगाईच्या मुकुंदराज परिसराला निसर्गाची देण आहे. दऱ्या-खोऱ्याने नटलेल्या या परिसरात निसर्ग सौंदर्याचे वैभव दाटलेले आहे. त्यात वनराई फुलण्याची गरज आहे. या परिसराला ऐतिहासिक महत्त्व असून सदरचे ठिकाण हे पर्यटनाच्या दृष्टीने योग्य असल्याने निसर्गरम्य परिसरात पर्यटनाच्या दृष्टीने पहिले पाऊल म्हणून या ठिकाणी ३३ काळवीट ३३ काळवीट जातीच्या हरणास नैसर्गिक अधिवासात सोडण्यात आले आहे.

सदरच्या ग्रॅसलँड सफारीचा प्रकल्प मराठवाड्यासारख्या डोंगराळ भागात पहिलाच प्रयोग असून या प्रकल्पातुन जैवविविधतता वाढवणे तसेच वनाचे संरक्षण व संवर्धन करण्याचा हेतू आहे. सदर प्रकल्प राबवल्यामुळे प्रकल्प क्षेत्रामध्ये विविध गवत प्रजातीची लागवड करून त्या ठिकाणी वन्य प्राण्यांना पानवठे निर्माण करण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे जंगलातील प्राणी जंगलातच राहतील आणि पर्यायाने जंगल शेजारील शेतकऱ्याच्या शेतातील पिकांचे वन्यप्राण्यामुळे नुकसान होणार नाही.

तसेच या क्षेत्रालगत मराठीचे आद्यकवी स्वामी मुकुंदराजांचे समाधी मंदिर, जोगेश्वरी देवीचे मंदिर, संत दासोपंत यांची समाधी, बुट्टेनाथ मंदिर, किरमानी दर्गा, मौलाली दर्गा, हत्तीखाना, बाराखांबी मंदिर लेणी, आकर्षक नृत्य असलेले संकलेश्वर मंदिर, जैन लेण्या तसेच परळी येथे बारा ज्योतिर्लिंग पैकी असलेले प्रभू श्री वैद्यनाथ महादेवाचे मंदिर इत्यादी धार्मिक तसेच ऐतिहासिक मंदिर व वास्तू असल्यामुळे येथे येणाऱ्या पर्यटक व भाविकांची संख्या अधिक असल्यामुळे या सफारीचा निश्चितच पर्यटकांना लाभ होईल तसेच स्थानिक लोकांना यापासून रोजगार निर्मिती सुध्दा होईल असे विभागीय वन अधिकारी (प्रा.) बीड यांनी नमूद केले आहे. ***

**'परळी परिसर'** हे साप्ताहिक मुद्रक, प्रकाशक, मालक एस.एल.वाकडे यांनी न्यू सुधांशू प्रिंटर्स, श्रीनाथ चित्र मंदिरमागे, शिवाजीनगर, परळी वैजनाथ, ता.परळी वैजनाथ, जि.बीड ४३१५१५ (महाराष्ट्र) येथे छापून तेथेच प्रकाशित केले. संपादक एस.एल.वाकडे.मो.९४२२३२८४९३. e-mail : parliparisar2017@gmail.com (या साप्ताहिकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या व लेखास संपादक सहमतच असतील असे नाही.)
**RNI No.-MAHMAR/2017/74640** **Post Reg.No.LSB/BEED/RNP-265 / 2026-2028** (सर्व वाद परळी न्यायकक्षेत) **www.parliparisar.com**
* वर्ष ०९ * अंक ४० * पृष्ठ संख्या- ४ परळी वैजनाथ, जि.बीड (महाराष्ट्र) सोमवार, दि. ०९ फेब्रुवारी २०२६ * किंमत : २ रू.

# ज्योतिर्लिंग वैद्यनाथ महाशिवरात्र यात्रा महोत्सव उत्साहात पार पाडा-जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

परळी वैजनाथ (बातमीदार):- महाशिवरात्र यात्रा महोत्सव उत्साहात व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने कामाला लागावे असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी परळीत घेतलेल्या प्रशासनाच्या आढावा बैठकीत दिले. प्रशासनाच्या सर्व विभागाचे प्रतिनिधी या बैठकीला उपस्थित होते.

बारा ज्योतिर्लिंगापैकी एक असलेल्या प्रभु वैद्यनाथ ज्योतिर्लिंगाची महाशिवरात्र यात्रा भरते. १५ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्र आहे. पाच दिवस ही यात्रा भरते. या यात्रेनिमित्त देशभरातील विविध भागातून लाखो भाविक परळीत दाखल होतात. या महाशिवरात्र यात्रेची पूर्वतयारी प्रशासन व वैद्यनाथ देवल कमिटीच्या वतीने करण्यात येत आहे. या निमित्ताने जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी परळीत प्रशासनाची आढावा बैठक घेतली. त्यानिमित्ताने वैद्यनाथ मंदिर येथे झालेल्या बैठकीत प्रशासनाने सर्व तयारी करावी, कायदा व सुव्यवस्था, भाविकांची गर्दी लक्षात घेऊन उपाययोजना, आरोग्य सुविधा, स्वच्छता, यादृष्टीने प्रशासकीय पातळीवर करण्यात आलेली पूर्वतयारी बाबत आढावा घेऊन यात्राकाळात आवश्यक तयारीबाबत त्यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी अंबाजोगाई उपविभाग अतिरिक्त पोलीस अधीक्षक चेतना तिडके, परळीचे उपविभागीय अधिकारी अरविंद लाटकर, तहसीलदार, शहर पोलीस निरीक्षक, संभाजीनगर पोलीस निरीक्षक,ग्रामीण पोलीस निरीक्षक, नगरपरिषद मुख्याधिकारी, महावितरण उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, स्वच्छता विभाग आदींसह प्रशासकीय विविध विभागाचे अधिकारी, प्रतिनिधी उपस्थित होते. या वेळी वैद्यनाथ देवल कमिटीचे सर्व विश्वस्त उपस्थित होते. देवल कमिटीच्या वतीने प्रशासनाकडून आवश्यक बाबी या बैठकीत मांडण्यात आल्या. यात्रा महोत्सव उत्साहात व सुव्यवस्थेत पार पाडण्यासाठी प्रशासनाने कामाला लागावे व शांततेत यात्रा महोत्सव पार पाडण्यासाठी सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले. **

# परळी वैजनाथ 'अमृत रेल्वे स्थानक' अत्याधुनिक व उच्च दर्जाचे उभारणार-आर.गोपालकृष्णन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा अमृत रेल्वे स्थानक या योजनेमध्ये समावेश करण्यात आलेला आहे. त्या अंतर्गत ४३ कोटी रुपयांच्या निधीतून रेल्वे स्थानक उभारणी होणार आहे. पहिल्या टप्यात १७ कोटी रुपयांच्या खर्चातून रेल्वे स्थानकातील बांधकामे सुरू आहेत. परळी वैजनाथ येथील अमृत रेल्वे स्थानक उच्च दर्जाचे व अत्याधुनिक पद्धतीने उभारले जाईल. यासाठी एक ते दीड वर्षाचा कालावधी लागणार असल्याची माहिती दक्षिण मध्य रेल्वेचे व्यवस्थापक आर गोपालकृष्णन यांनी आज दिली.



परळी वैजनाथ रेल्वे स्थानक येथे सुरू असलेल्या रेल्वे स्थानकाच्या उभारणीचे, रेल्वे मार्गाचे, परळी परभणी नांदेड या दुहेरी मार्गाच्या कामाचे तसेच अन्य तांत्रिक व बांधकाम विषयक कामांचा आढावा घेण्यासाठी आर गोपालकृष्णन हे परळी वैजनाथ रेल्वे स्थानकावर आले होते. रेल्वे प्रवाशांची सुरक्षितता व रेल्वे स्थानकांची सुरक्षितता या दृष्टिकोनातून आपण पाहणी केल्याचे त्यांनी सांगितले. दक्षिण मध्य रेल्वे आणि मध्य रेल्वे यांच्या मुख्य प्रवाहात आता परळी वैजनाथ रेल्वे स्थानक येणार आहे. अमृत रेल्वे स्थानक म्हणून परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाचा समावेश करण्यात आलेला असून ४३ कोटी रुपये खर्चातून एक अत्याधुनिक व उच्च दर्जाचे रेल्वे स्थानक उभारण्यात येत आहे. येत्या एक ते दीड वर्षात हे काम पूर्ण होणार आहे. तसेच परळी बीड नगर रेल्वे मार्गाचे कामही जलद गतीने सुरू आहे. वंदे भारत रेल्वे परळीतून सुरू करण्याच्या मागणीबाबत वरिष्ठ स्तरावर आपण नागरिकांच्या भावना कळवू अशी माहिती दक्षिण मध्य रेल्वेचे मुख्य व्यवस्थापक आर गोपाल कृष्णन यांनी दिली. यावेळी परळी रेल्वे विकास समितीच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदनही त्यांना देण्यात आले. परळी रेल्वे विकास समितीच्या वतीने जी.एस. सौंदळे, चेतन सौंदळे, कैलास तांदळे, विष्णू मुंडे, माऊली आघाव आदीसह सदस्य, परळीकर नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. ***

# इस्रोच्या अभ्यास दौऱ्यासाठी समीक्षा यल्लावाड हिची निवड



परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी तालुक्यातील वसंतनगरच्या उच्च माध्यमिक विद्यालयाची विद्यार्थिनी समीक्षा राजकुमार यल्लावाड हिची महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या राज्यस्तरीय निवड परीक्षेत यश संपादन केल्यामुळे तिची इस्रो (भारतीय अंतराळ संशोधन संस्था) अभ्यास दौऱ्यासाठी निवड झाली आहे. या अभ्यास दौऱ्यासाठी संपूर्ण राज्यातून केवळ १०० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून, त्यामध्ये परळीतील समीक्षा राजकुमार यल्लावाड हिचा समावेश झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

समीक्षा यल्लावाड ही उच्च माध्यमिक आश्रम शाळा, वसंतनगर येथे शिक्षण घेत आहे. तिच्या या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष संजयजी राठोड, सचिव रामेश्वर राठोड,महाविद्यालयाचे प्राचार्य अरुण पवार, माजी सरपंच डी एस राठोड, सरपंच विजय राठोड याबरोबरच प्रा.नागरगोजे सर, प्रा.देशमुख सर, प्रा.सुरनर सर, प्रा.परळीकर, प्रा.आगरे, प्रा.जाधव,सर प्रा.मोरे सर, स्वामी सर, गीते सर,राम राठोड सर ( प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक) कै.लक्ष्मीबाई देशमुख शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संजयजी देशमुख, सचिव रवींद्रजी देशमुख, कोषाध्यक्ष प्रसादजी देशमुख, प्राचार्य डॉ. विद्या देशपांडे, तसेच दोन्ही महाविद्यालयांतील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी, मित्रपरिवार व पालकांनी तिचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या राज्यस्तरीय परीक्षेत विज्ञान, तंत्रज्ञान, सामान्यज्ञान, तार्किक क्षमता व बौद्धिक कौशल्यावर आधारित प्रश्नांचा समावेश होता. या कठीण परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी करत समीक्षा यल्लावाड हिने आपली गुणवत्ता सिद्ध केली. इस्रोच्या अभ्यास दौऱ्यात विद्यार्थ्यांना उपग्रह तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, रॉकेट प्रक्षेपण प्रक्रिया तसेच वैज्ञानिक प्रयोगशाळांची प्रत्यक्ष माहिती मिळणार आहे. या यशामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण झाले असून, भविष्यात अंतराळ विज्ञान क्षेत्रात कार्य करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना नवी दिशा मिळाली आहे. समीक्षा यल्लावाड हिच्या पुढील शैक्षणिक व वैज्ञानिक वाटचालीसाठी सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. **

# परळी बाजार समितीच्या नियोजित गुरांच्या बाजारचे सोमवारी उद्घाटन

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी कृषि उत्पन्न बाजार समितीच्या नियोजित मार्केट यार्ड ब्रम्हवाडी येथे गुरांच्या बाजारचे सोमवारी (दि.९) उद्घाटन होणार आहे.

आ.धनंजयजी मुंडे यांच्या प्रयत्नातून हा बाजार सुरू होत आहे. या गुरांच्या बाजारचे पशुसंवर्धनमंत्री ना.पंकजाताई मुंडे, आ.धनंजयजी मुंडे यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी माजी आमदार संजय दौंड, अजय मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी, उपनगराध्यक्ष खैसर राजा खान आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सकाळी ९.३० वाजता उद्घाटनाचा कार्यक्रम होणार असून यावेळी उपस्थित राहण्याचे आवाहन बाजार समितीचे सभापती सुर्यभान मुंडे व त्यांच्या सहकाऱ्यांनी केले आहे. ***

# सर्वंकष विकासाच्या दृष्टीने न.प.ची 'जम्बो' विषयसूचीला मंजुरी-नगराध्यक्षा पद्मश्री धर्माधिकारी

परळी वैजनाथ, (बातमीदार):- परळी वैजनाथ नगरपरिषदेची सर्वसाधारण सभा नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहपूर्ण व खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. शहराच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने तब्बल ३७ विषयांची 'जम्बो' विषयसूची सभेपुढे मांडण्यात आली. या सर्वसाधारण सभेत शहर विकासाच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे विविध विकास आराखडे, योजना व प्रस्तावांना सभेने तत्त्वतः मंजुरी दिली.



परळी वैजनाथ नगरपरिषद सभागृहात नगराध्यक्षा सौ.पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती. सभेच्या प्रारंभी मागील सभेच्या इतिवृत्तांतास मान्यता देण्यात आली. त्यानंतर सन २०२६-२७ साठीच्या जिल्हा वार्षिक योजनेचा प्रारूप आराखडा सादर करण्यात आला. शासनाच्या विविध निर्णयांच्या अनुषंगाने 'नमो उद्यान' विकास, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियानाची अंमलबजावणी, विशिष्ट नागरी सेवा व सुविधा पुरविण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबत चर्चा झाली.

शहराच्या पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सौरऊर्जा प्रकल्प, धुळमुक्त शहर उपक्रम, व्हिज्युअल पॉल्युशनवर उपाययोजना, पी-१,पी-२ पार्किंग व्यवस्था, तसेच वाढीव पाणीपुरवठा योजनेसाठी डीपीआर तयार करण्याबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. महाशिवरात्री निमित्त प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग परिसरातील विविध विकास कामांचे नियोजन, शहरातील धार्मिक स्थळे व सभागृहांचे पीटीआर तयार करणे, नगरपरिषद मालकीच्या नाट्यगृह, इमारती व गाळे भाडेतत्त्वावर देणे व भाडेदर पुनर्निश्चिती यावरही सविस्तर विचारविनिमय झाला.शहर नियोजनाच्या दृष्टीने प्रादेशिक आराखडा, टीडीआर अंतर्गत जमीन मालकांना मोबदला, कोंडवाडा व्यवस्थापन, भटकी जनावरे नियंत्रणासाठी दंड व शुल्क निश्चिती, मालमत्ता फेरमूल्यांकन, अतिक्रमण सर्वेक्षण, तसेच विविध विभागांसाठी आवश्यक यंत्रसामग्री खरेदीसाठी ई-निविदा प्रक्रियेला मंजुरी देण्यात आली.

स्वच्छ सर्वेक्षण २०२५-२६ अंतर्गत परळी शहराला 'कचरा मुक्त शहर ३ स्टार' व ओडीएफ+ घोषित करण्यासाठी सहभाग नोंदविण्याचा निर्णय घेण्यात आला. पर्यावरणपूरक उपक्रमांतर्गत कचऱ्यापासून इंधन निर्मिती प्रकल्प, जल पुनर्भरण अभियानाचा प्रचार-प्रसार, तसेच संविधान भवन उभारणीसाठी शासनाकडे प्रस्ताव सादर करण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. एकूणच परळी वैजनाथ शहराच्या चौफेर विकासाला चालना देणारी ही सर्वसाधारण सभा ठरली असुन आगामी काळात शहराच्या विकासकामांना वेग येण्याच्या दृष्टिकोनातून ही सर्वसाधारण सभा महत्त्वपूर्ण ठरली आहे. यावेळी नगराध्यक्षा सौ. पद्मश्रीताई बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह उपनगराध्यक्ष खैसर राजा खान पठाण विविध विषय समित्यांचे सभापती, सर्व न प सदस्य, सदस्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्राधिकृत अधिकारी म्हणून नगरपरिषदेचे उपमुख्य अधिकारी संतोष रोडे यांनी कामकाजाचे संचालन केले.

**उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सभागृहाने वाहिली श्रद्धांजली**

दरम्यान दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना सभागृहाच्या कामकाजाच्या सुरुवातीला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. अजितदादा पवार यांच्या अकाली निधनाने संपूर्ण महाराष्ट्राचे मोठे नुकसान झाले असुन परळी नगर परिषदेला सातत्याने विकासात्मक वाटचालीसाठी पाठीशी राहणाऱ्या अजितदादा पवार यांच्या निधनाने परळी शहराची मोठी हानी झाली असल्याच्या भावना व्यक्त करत यावेळी नगरपरिषदेच्या सभागृहाच्या वतीने त्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. **